साठवणीतील गाणी

# चिरतरुण स्वर
# आशा भोसले




सुहास किर्लोस्कर

राजहंस प्रकाशन

घराघरामध्ये दिवसभर लावला जाणारा रेडियो नसता
तर कदाचित वैविध्यपूर्ण संगीताची आवड
लहानपणापासून जोपासली गेली नसती,
त्या रेडियोच्या रम्य स्मृतीला...

## आठवणीतील गाणी, मनात साठवणीसाठी...

हिंदी चित्रपटसंगीतातली चार लखलखती नक्षत्रे

**आवाजाचा अवलिया - किशोर कुमार**

**नवरसांचा जादूगार - मोहम्मद रफी**

**चिरतरुण स्वर - आशा भोसले**

**सुरांची सम्राज्ञी - लता मंगेशकर**

यातला प्रत्येक क्यूआर कोड तुम्हाला देईल
पंचवीस अप्रतिम गाण्यांचा नजराणा..!

# अनुक्रम


- माझिया मना, जरा बोल ना... / ०९
- भावपूर्ण गायनामधील अचंबित करणारं वैविध्य - आशा भोसले / ११

१. घर जायेगी तर जायेगी / ३७

२. एकाच या जन्मी जणू / ४०

३. और इस दिल में क्या रख्खा है / ४३

४. मांग में भर ले रंग सखी री / ४६

५. कोई कह दे / ४९

६. ओ चाँद जहाँ वो जाये / ५२

७. निगाहें मिलाने को जी चाहता है / ५५

८. तोरा मन दर्पण कहलाये / ५८

९. देखने में भोला है / ६१

१०. नको रे नंदलाला / ६४

११. नाज़नीं बड़ा रँगीं है वादा तेरा / ६७

१२. दिल चीज़ क्या है / ७०

१३. अभी ना जाओ छोड़कर / ७३

१४. कतरा कतरा / ७६

१५. जानूँ जानूँ री.. / ७९

१६. अंबर की इक पाक सुराही / ८२

१७. दीवाना हुआ बादल / ८५

१८. चांदणे शिंपीत जाशी / ८८

१९. इंतेहा हो गयी / ९१

२०. जाइये आप कहाँ जायेंगे / ९५

२१. एक बात मान लो तुम / ९८

२२. आज कुणीतरी यावे / १०१

२३. मलमली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे / १०३

२४. तू तू है वही दिल ने जिसे / १०६

२५. साक़िया आज मुझे नींद नहीं आयेगी / १०९

---

**आपली आवड**

प्रिय वाचक,

या २५ गाण्यांची निवड लेखकांनी केलीय. ते चित्रसंगीताचे ख्यातनाम जाणकार आहेत. त्यांची निवड छानच आहे. पण तुमच्या आवडीची काही गाणी वेगळीही असू शकतील. 'या पुस्तकात ही गाणी हवीच होती!' असंही तुम्हाला वाटेल. तर वाचकांनी यातल्या कुठल्याही गाण्यांऐवजी स्वतःच्या आवडीची तीन गाणी निवडावीत, आणि तीच का निवडली हे आम्हाला २०० शब्दांत लिहून खाली दिलेल्या ई-मेलवर पाठवावं. तीन सर्वोत्तम लेखांना 'ग्रंथवेध'मध्ये प्रसिद्धी आणि राजहंसतर्फे ग्रंथभेट देण्यात येईल.

ई-मेल : rajhansgranthvedh@gmail.com

# माझिया मना, जरा बोल ना....

किशोर-आशा हे माझे जिव्हाळ्याचे विषय, त्यामुळे त्यांच्याबद्दल लिहिणं हा मनस्वी आनंदाचा भाग आहे; पण सगळ्यात अवघड काय आहे माहीत आहे, आशा भोसले यांची फक्त २५ गाणी निवडणं. आता कोणी अशी कामगिरी दिली, की आशाची राग-संगीतावर आधारित २५ गाणी निवड, नृत्याची २५ गाणी निवड किंवा ठरावीक दशकातील २५ गाणी निवड; तर ते अवघड नाही. दुःख व्यक्त करणारी २५ गाणी निवडायची झाली, तर दुःखाच्या प्रत्येक शेडवर आशाताईंची गाणी निवडता येतील. आनंदी भाव व्यक्त करणारी गाणी निवडायची वेळ आली, तरी आनंद व्यक्त करण्याच्या अनेक पद्धती असतात. स्मित हास्य, गडगडाट करणारं हास्य, मंद स्मित, ओठातल्या ओठात हसणं, लाजून हसणं असे हास्याचे अनेक प्रकार आहेत. त्या प्रत्येक प्रकारावर आशाताईंचं किमान एक गाणं निवडता येईल, इतकं काम त्यांनी करून ठेवलं आहे.

तुका म्हणे होय मनासी संवाद
आपुलाची वाद आपणासी

अशा अवस्थेतून गेल्यावर २५ गाणी निवडण्याचे वेगवेगळे प्रकार करून बघितले. त्यांपैकी काही प्रकार आशाताईंच्या लेखामध्ये समाविष्ट केले आणि किशोरकुमारची २५ गाणी निवडताना जसं वेगवेगळ्या दशकांतील संगीतकारांचं वैविध्य जपलं, तसंच आशा भोसले यांची गाणी निवडताना संगीतकारानुसार आशाताईंच्या गाण्याची वर्गवारी केली. ५ मराठी गाणी आणि २० हिंदी गाणी निवडण्याचं ठरलं. आशा भोसले यांनी मराठी गाण्यांमध्येही इतकं प्रचंड वैविध्य जपलं आहे. त्यांतली पाचच गाणी कशी निवडणार? ‘एक होता विदूषक’

चित्रपटात एक लावणी आहे. वय झालेली नायिका ती लावणी गाण्याचा प्रयत्न करते, त्या वेळी तिचा आवाज साथ देत नाही. तत्परतेनं तिचा मुलगा तिच्या मागे उभा राहून तिला आवाज देतो, असा प्रसंग आहे. आशा भोसले यांनी पहिली ओळ 'वयस्कर आई'च्या आवाजात गायली आहे आणि त्यानंतर पूर्ण लावणी लहान मुलाच्या आवाजात गायली आहे, परंतु तो बालकाचा आवाज नाही किंवा 'नाच रे मोरा'साठी वापरलेला आवाजही नाही. अशी कित्येक गाणी समाविष्ट करता आली नाहीत.

'मन वढाय वढाय, उभ्या पिकातलं ढोर' या आशाताईंनी गायलेल्या गाण्यात बहिणाबाईंनी सांगितल्यासारखी मनाची सैरभैर अवस्था झाली. 'इतनी बड़ी महफ़िल और ये दिल किसको दूं' याच गाण्याच्या ओळी सारख्या आठवू लागल्या. 'आशा'च्या गाण्यांना सर्वांत जास्त वाव देणाऱ्या; त्यांच्या गायकीला न्याय देणाऱ्या ओ. पी. नय्यर, राहुल देव बर्मन यांची प्रत्येकी तीन गाणी; सचिन देव बर्मन, हृदयनाथ मंगेशकर, सुधीर फडके, खय्याम, जयदेव यांची प्रत्येकी दोन गाणी घेतली. उस्ताद विलायत खां यांचं 'अंबर की इक पाक सुराही' हे गाणं घेतल्याशिवाय ही यादी पूर्ण होऊ शकली नसती. पण दुर्मीळ गाण्यांचा रसास्वाद करणं टाळलं आहे. फार कमी ऐकलं गेलेलं गाणं ऐकवून श्रोत्यांच्या/वाचकांच्या मनात अपराधी भावना वाढीस लावल्यासारखं वाटतं.

'मेरी बात रही मेरे मन में, कुछ कह न सकी उलझन में' अशी गत होऊ नये म्हणून हे सुतोवाच!

अशा तऱ्हेच्या पुस्तकाची संकल्पना करणारे प्रकाशक श्री. दिलीप माजगावकर, राजहंसचे ज्येष्ठ संपादक डॉ. सदानंद बोरसे, या पुस्तकाचे संपादक शिरीष सहस्रबुद्धे, निर्मितीसाठी सहकार्य करणारी शिरीष शेवाळकर यांची टीम : विशेषतः मुखपृष्ठकार तृप्ती देशपांडे, वैशाली जोशी, डीटीपी व मुद्रितशोधन करणारे सहकारी अशा सर्वांना त्यांच्या मौलिक सहयोगाबद्दल मन:पूर्वक धन्यवाद.

**- सुहास किर्लोस्कर**

# भावपूर्ण गायनामधील
# अचंबित करणारं वैविध्य - आशा भोसले

पार्श्वगायन म्हणजे चित्रपटाच्या पडद्यावर असलेल्या कलाकाराच्या भावना प्रसंगाप्रमाणे व्यक्त करून गायन करणं. चित्रपटामध्ये असंख्य प्रकारचे प्रसंग असतात, अनेक प्रकारचे भाव गाण्यामधून व्यक्त होत असतात. पार्श्वगायनामध्ये आवाज फक्त 'गोड' आणि 'सुरेल' असून चालत नाही, तर त्याला अभिनयाची जोड द्यावी लागते. राग, लोभ, प्रेम, रोमान्स, भक्ती, भीती, असूया, आनंद, आश्चर्य, अभिमान अशा अनेक प्रकारच्या भावना प्रसंगाला साजेशा गाण्यांमधून व्यक्त कराव्या लागतात. भारतीय चित्रपटामध्ये कोणत्याही प्रसंगामध्ये नायक-नायिका तसेच खलनायक-नायिकासुद्धा गाणं म्हणू शकतात! या सर्व प्रकारच्या प्रसंगांची गाणी लीलया पेलणारी एकमेव गायिका म्हणजे आशा भोसले.

हिंदी चित्रपटामध्ये गाण्यासाठी तयार केलेल्या एकापेक्षा एक अनोख्या प्रसंगांमध्ये उत्कट अभिनय स्वरांमधून व्यक्त करणाऱ्या आशा भोसले यांनी कमावलेल्या अष्टपैलुत्वामधलं वैविध्य प्रदीर्घ काळात निरंतर जपलं आहे. स्वतःचं अस्तित्व सिद्ध करण्याची वेळ आल्यावर त्यांनी आपलं वेगळेपण काय याचा शोध घेतला. कोणाचीही नक्कल न करता मिळतील त्या गाण्यांमध्ये साभिनय गायन करत आपली वेगळी ओळख निर्माण केली आणि त्यावर स्वतःचा ठसा उमटवला. १४ भाषांमधील १२०००पेक्षा अधिक गाण्यांतील भाषांचं, गायकीचं, संगीतप्रकारांचं, संगीतदिग्दर्शकांच्या शैलीचं वैविध्य आशा भोसले यांच्या गायकीमध्ये दिसतं.

**भोगले जे दुःख त्याला....**

८ सप्टेंबर २०२४ रोजी वयाची नव्वद वर्षं उत्साहात साजरी करणाऱ्या आशाताईंचा जन्म मा. दीनानाथ मंगेशकर या प्रख्यात गायकाच्या घरी

झाला. वयाच्या नवव्या वर्षी वडिलांच्या निधनामुळे मिळालेलं खडतर बालपण असो वा सगळीकडेच मिळालेली दुय्यम वागणूक असो वा वैयक्तिक आयुष्यात नेहमीच करावा लागलेला संघर्ष असो, इतक्या नकारात्मक घटना झेलल्यावर अन्य कोणालाही नैराश्यानं ग्रासलं असतं. अनेक विपरीत प्रसंग, अपमान यांचा सामना धीरानं करून ज्या शिखरावर आशा भोसले पोहोचल्या आहेत; ते बघता, आशा भोसले होणं किती अवघड आहे, याची कल्पना करता येते. सांगली ते मुंबई व्हाया कोल्हापूर असा प्रवास करताना, वयाच्या दहाव्या वर्षी 'माझा बाळ' या चित्रपटासाठी दत्ता डावजेकर यांच्या संगीतदिग्दर्शनामध्ये 'चला चला नव बाला' हे गाणं आशा गायली आणि त्यांची गायन क्षेत्रातील कारकीर्द सुरू झाली. वयाच्या सोळाव्या वर्षी 'चुनरिया' चित्रपटासाठी 'सावन आया' (हंसराज बहल) हे गाणं गायलं. याच वर्षी म्हणजे १९४८ साली घरामध्येच सेक्रेटरीचं काम करणाऱ्या गणपत भोसले यांच्याशी विवाह केला, ज्याला घरातील सर्वांचा विरोध होता. खाजगी आयुष्यातील धक्के सहन करण्याबरोबरच संगीतकारांनी दिलेली दुय्यम वागणूक हासुद्धा मनोधैर्य खच्ची करणारा विषय होता. तरीही आशा भोसले यांनी मिळतील ती गाणी गायली.

आशा भोसले यांना कोणती गाणी मिळाली? लो बजेट फिल्ममध्ये किंवा लता मंगेशकर यांच्या तारखा मिळाल्या नसतील, तर संगीतदिग्दर्शक आशा भोसले यांचा विचार करायचे. मास्टर कृष्ण दयाळ, विनोद, हंसराज बहल, धनीराम, वसंत प्रकाश अशा संगीतकारांनी आशा भोसले यांना सुरुवातीच्या काळात गाणी गाण्याची संधी दिली. १९४७ ते १९४९ साली 'चुनरिया', 'लेख' आणि 'खेल' या चित्रपटांमध्येच त्यांना गाण्याची संधी मिळाली. १९५३ साली 'अरमान' चित्रपटानंतर आशा भोसले या गायिकेला नाव मिळण्यास सुरुवात झाली. सचिन देव बर्मन यांनी १९५३ साली देव आनंद - मधुबाला अभिनीत 'अरमान' चित्रपटासाठी तलत महमूद यांच्याबरोबर 'चाहे कितना तुम मुझे बुलाओ जी' गाण्याची संधी दिली. हे tandem गाणं त्या काळात गाजलं होतं.

अनेक संगीतदिग्दर्शकांनी नायिकेच्या मैत्रिणीसाठी, सह-नायिकेसाठी किंवा हेलन-बिंदू-अरुणा इराणी यांच्या नृत्याच्या गाण्यांसाठीच आशा भोसले यांचा आवाज वापरला. मदनमोहन यांनी 'झुमका गिरा रे'सारख्या गाण्यासाठीच आशाचा आवाज वापरला. शंकर-जयकिशन असो वा लक्ष्मीकांत-प्यारेलाल, सर्वांची पहिली पसंती लताच्या आवाजाला होती. या पार्श्वभूमीवर ओंकार प्रसाद नय्यर यांनी धाडस केलं आणि त्यांनी गीता दत्त-शमशाद बेगम यांच्यानंतर आशाचा आवाज बहुसंख्य गाण्यांत वापरला.

त्यांच्या गाण्यांच्या रेकॉर्डिंगला स्टुडियो उपलब्ध होऊ शकणार नाहीत, अशी परिस्थिती येऊनसुद्धा ते बधले नाहीत. सचिन देव बर्मन यांनी लताशी मतभेद झाल्यानंतर चार वर्षं फक्त आशाचा आवाज वापरला. राहुल देव बर्मन यांनी त्यांच्यामधील मतभेद एका बैठकीत सोडवल्यानंतर पुन्हा सचिन देव बर्मन बहुसंख्य गाण्यांसाठी लताचा विचार करत होते. एकूण परिस्थितीचा विचार करता आशा भोसले यांनी किती अवघड परिस्थितीतून मार्ग काढून स्वतःचं स्थान मिळवलं आहे, याची कल्पना येते.

**ज़िंदगी के रंग कई रे....**

गायकाच्या घरी जन्म घेतल्यामुळे पोषक वातावरण मिळालं, तरीही सुरुवातीची बरीच वर्षं त्यांना काम मिळवण्यासाठी बराच संघर्ष करावा लागला. स्वतःची वेगळी ओळख निर्माण होण्यासाठी, कलाकार होण्यासाठी आशा भोसले यांनी निरंतर शिकण्याची तपश्चर्या केली. बदलत्या काळातील बदलत्या संगीतानुसार आवाजाचा पोत बदलून त्या आवाजामध्ये गाणी पेश करण्याची कलाही त्यांनी अवगत केली. या गाण्यांचा आवाका बघितल्यावर, गाणी ऐकल्यावर असं काम इतकी वर्षं एकच व्यक्ती कसं काय करू शकते, असा प्रश्न पडत राहतो.

आशा भोसले यांच्याच शब्दांत सांगायचं झालं तर, ''जगण्यासाठी जसा श्वास घेणं आवश्यक असतं, त्याप्रमाणेच संगीत हा माझा श्वास आहे. अनेक कठीण प्रसंगांमधून मी सावरू शकले, याचं कारण संगीत माझ्याबरोबर होतं.'' संगीतकार ए. आर. कुरेशी अर्थात उस्ताद अल्लारख्खा यांनी संगीतबद्ध केलेली 'रब उसका है रखवाला' ('हतीमताई की बेटी' १९५५), 'सनम तुम दिवाने किस के' ('इंद्रसभा' १९५६), 'सजन रसिया से बलम छलिया से' ('परवीन' १९५७), ही वयाच्या २४व्या वर्षी गायलेली 'आशा'मय गाणी ऐकल्यावर आजही त्यांमधील भावदर्शन अचंबित करतं. अमीरबाई कर्नाटकी, शमशाद बेगम, नूरजहाँ, गीता दत्त, लता मंगेशकर अशा दिग्गज गायिका हिंदी चित्रपटसृष्टीत पार्श्वगायिका या नात्यानं नावलौकिक मिळवत होत्या. त्यामध्ये आशा भोसले यांना गाणी मिळवण्यासाठी किती झगडावं लागलं असेल, याची कल्पना करता येईल. आशा भोसले यांनी एका मुलाखतीत सांगितलं आहे, ''त्या वेळेला लता मंगेशकर या नावाचा चमकता सूर्य लखलखत होता. तिच्यासमोर उभं राहायचं पण तिच्यासारखं नाही गायचं, आपली गाण्याची नवीन स्टाइल निर्माण करायची अशा जिद्दीनं मी चित्रपटसृष्टीत आले; उर्दू शिकले, हिंदी शिकले, वेगळं स्थान निर्माण करायचं या ईर्षेनं स्वतःची वेगळी शैली निर्माण केली; म्हणूनच काम मिळालं.''

ओंकार प्रसाद नय्यर यांनी १९५२ साली ‘छम छमा छम’ या त्यांच्या दुसऱ्या चित्रपटात आशा भोसले यांना ‘आ परदेसी बालमा’ गाण्याची संधी दिली आणि त्यानंतर काही काळ गीता दत्त - आशा भोसले या दोघींची निवड केली आणि त्यानंतरच्या चित्रपटांत १९७२पर्यंत फक्त आशा भोसले यांनाच गाणी दिली. त्यानंतर त्यांचे सूर जुळले प्रयोगशील संगीतकार राहुल देव बर्मन यांच्याबरोबर. गायनामध्ये नवनवीन आव्हानं देणाऱ्या गाण्यांसाठी आशा भोसले यांची निवड करणाऱ्या संगीतकारांमध्ये ओ. पी. नय्यर, सचिन देव बर्मन, राहुल देव बर्मन आघाडीवर होते. राहुल देव बर्मन यांनी एक पाऊल पुढे जाऊन आशा भोसले यांच्या गायनकौशल्याला पुरेपूर वाव देणारी ‘दम मारो दम’, ‘आजा आजा मैं हूं प्यार तेरा’, ‘दैय्या रे दैय्या मैं कहां फंसी’ अशी अनेक प्रयोगशील गाणी संगीतबद्ध केली आहेत. राहुल देव बर्मन यांच्या ‘घर जायेगी तर जायेगी’ या गाण्यात लग्नाची आतुरतेनं वाट बघणाऱ्या नायिकेच्या मनातली चलबिचल व्यक्त करण्यासाठी प्रत्येक शब्दातल्या स्वरांचे चढउतार ऐकतानाच दमछाक होते.

### हे जीवन सुंदर आहे

आशा भोसले यांची मराठी गाणी भरपूर आहेत आणि त्यात विविधताही तेवढीच आहे. ‘या सुखांनो या’ हे सदाबहार गाणं दर वेळी पुन:प्रत्ययाचा वेगळा आनंद देतं आणि आपण दिवसभर ते गाणं गुणगुणत राहतो. ‘पांडुरंग कांती दिव्य तेज झळकती’, ‘हात नका लावू माझ्या साडीला’, ‘रंग नको टाकू माझी भिजेल कोरी साडी’, ‘एक झोका’, ‘सुहास्य तुझे मनास मोही’, ‘मी मज हरपून बसले गं’, ‘नाच रे मोरा’, ‘मना तुझे मनोगत कळेल का’ अशी विविध ढंगांची गाणी गाणाऱ्या आशा भोसले यांच्या गाण्यातलं अभिनयकौशल्य काय वर्णावं!

मराठी सिनेसंगीतामध्ये आशा भोसले यांनी वेगवेगळ्या गायकांबरोबर सहगायन केलं आहे. त्यांतील काही वेगळी गाणी सदाबहार आहेत. यमन रागावर आधारित ‘धुंदी कळ्यांना...धुंदी फुलांना’ फार सुरेख गाणं आहे. जगदीश खेबुडकर यांच्या काव्याला संगीतकार सुधीर फडके यांनी स्वरबद्ध करताना शेवटच्या कडव्याला वेगळी चाल दिली आहे. ‘चिरंजीव होई..’ हे कडवं अनोखं आहे.

‘मराठा तितुका मेळवावा’ (१९६४) या चित्रपटासाठी आनंदघन यांनी स्वरबद्ध केलेलं आणि हृदयनाथ मंगेशकर यांनी आशा भोसले यांच्याबरोबर गायलेलं ‘नाव सांग सांग सांग, गाव सांग’ हे असंच नितांत सुंदर गाणं. शांता शेळके यांचे शब्द आणि आशा भोसले यांचा गाण्यातला आणि बोलण्यातला ठसका श्रवणीय. पं. हरिप्रसाद चौरसिया यांची बासरी, पं. शिवकुमार शर्मा यांचं

संतूर आणि ढोलकी यांचा सुरेल संगम म्हणजे हे गाणं. अंतऱ्याला केहेरवा तालातील लय बदलते, म्हणजे निम्म्या लयीनं कमी होते. लय-ताल, शब्द-सूर यांचा खेळ असणारं हे गाणं आशा भोसले यांनी भाऊ हृदयनाथबरोबर कमालीच्या सफाईनं गायलं आहे. मन्ना डे यांच्यासह गायलेलं 'चांद गगनी आला, सख्या रे, सोड मला जाऊ दे...' (नंदादीप) हे हिराकांत कलगुटकर यांनी लिहिलेल्या आणि अविनाश व्यास यांनी स्वरबद्ध केलेल्या गाण्यात आशा भोसले यांच्या स्वरात आर्जव ऐकू येतं.

गायिका आशा भोसले यांच्याकडे सकारात्मक दृष्टिकोनाचं मूर्तिमंत उदाहरण म्हणून बघावं. विपरीत परिस्थितीमध्ये न खचता स्वतःची ओळख बनवणं आणि इतकी वर्षं काल सुसंगत राहणं हे केवळ 'आशा'च करू शकते. रवींद्र साठे-अंजली मराठे यांच्यासह गायलेलं 'हे जीवन सुंदर आहे' हे गाणं एकाच विश्वाकडे दोघांचा वेगवेगळा दृष्टिकोन दाखवतं. सुधीर मोघे यांचे शब्द हेच सांगतात, की जग कसं आहे हे तुमच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे.. वेगळ्या धाटणीचे चित्रपट निर्माण करणाऱ्या स्मिता तळवलकर यांच्या 'चौकट राजा' (१९९१) या चित्रपटाचे संगीतकार आनंद मोडक यांनी आशा भोसले यांची अनेक अवीट गाणी दिली आहेत, त्यांतलंच हे एक गाणं. या गाण्यामध्ये नायक रवींद्र साठेंच्या आवाजात सद्य:परिस्थितीबद्दल तक्रार करतो; पण आशा त्याचा गाण्यामधून प्रतिवाद करतात, जो सकारात्मक आहे. 'कोठेही जा अवतीभोवती निसर्ग एकच आहे', 'इथे-तिथे संगीत अनामिक एकच घुमते आहे', 'हे जीवन सुंदर आहे'.

विविध प्रसंगांवरील वैविध्यपूर्ण गाणी मराठीत गाण्याची संधी सुधीर फडके यांच्या संगीतदिग्दर्शनामध्ये मिळाली आणि त्या सर्व गाण्यांचं आशा भोसले यांनी सोनं केलं. 'धुंद एकांत हा', 'स्वप्नात रंगले मी', 'जिवलगा कधी रे येशील तू', 'का रे दुरावा, का रे अबोला', 'स्वप्नात रंगले मी' अशी एकापेक्षा एक गाणी मराठी श्रोत्यांचे कान तृप्त करणारी ठरली. 'एक वार तरी राम दिसावा' ('मोलकरीण' १९६३) या गाण्यातील आर्तता व्यक्त करण्यासाठी वसंत देसाई यांनी आशा भोसले यांची सार्थ निवड केली आणि ते गाणं आजही डोळ्यांत पाणी आणतं. विश्वनाथ मोरे यांनी संगीतबद्ध केलेली 'स्वप्नात साजणा येशील का' ('गोंधळात गोंधळ' - जगदीश खेबुडकर), 'गंध फुलांचा गेला सांगून' ('भालू' - पी. सावळाराम); राम कदम यांची 'बुगडी माझी सांडली गं', 'अंतरीचे गूज माझ्या आज ये ओठावरी', 'कधी तू दिसशील डोळ्यापुढे'; अनिल-अरुण यांची 'रुपेरी वाळूत माडांच्या बनात', 'येऊ कशी प्रिया' अशी वेगवेगळ्या संगीतकारांची अनेक गाणी आजही रसिकांच्या ओठांवर

रुळली आहेत. ‘या सुखांनो या’ हे सदाबहार गाणं दर वेळी पुनःप्रत्ययाचा वेगळा आनंद देतं. यामध्ये अर्थात संगीतकार सुधीर फडके यांच्या संगीतदिग्दर्शनाचं कौशल्य आहेच; पण त्यावर आशा ही मोहोर आहे, त्यामुळे आपण दिवसभर ते गाणं गुणगुणत राहतो. या गाण्याला चार चांद लावणाऱ्या आशा ग. दि. माडगूळकरांच्या बोलांप्रमाणे ‘अंगणी प्राजक्त आणि सौधावरी चांदणे’ झाल्या.

**आओ हुजूर तुम को सितारो में ले चलू....**

हिंदी चित्रपट संगीतामध्ये सचिनदेव बर्मन - ओ. पी. नय्यर यांच्यापासून ए. आर. रेहमानपर्यंत सर्वांच्या ‘मैफिलीचा’ अविभाज्य भाग बनलेल्या आशा भोसले कितीतरी संगीतकारांच्या संगीतशैलीनुसार स्वतःला बदलत गेल्याचं जाणवतं. ‘काली घटा झूमें’ (बुलो सी रानी – ‘जादू महल’ – १९६२), ‘देख हमें आवाज न देना’ (सी. रामचंद्र), ‘कोई सहेरी बाबू’ (लक्ष्मीकांत-प्यारेलाल), ‘सुनी सुनी सांस के सितार पर’ (शंकर-जयकिशन – ‘लाल पत्थर’) अशा जुन्या गाण्यांपासून ए. आर. रेहमान यांच्या ‘रंग दे मुझे रंग दे’पर्यंत अनेक संगीतकारांची गाणी त्यांच्या संगीतशैलीनुसार गायली आहेत, तरीही त्यावर आशाचा ठसा उमटवला आहेच. ‘बलमा खुली हवा में’, ‘आईये मेहेरबाँ’पासून ‘वो हसीन दर्द दे दो’ अशा अनेक गाण्यांमधून ओ. पी. नय्यर यांच्या संगीतामधील वैविध्य आणि त्यांनी आशाताईंच्या आवाजाचा केलेला वापर दिसून येतो. सी. रामचंद्र यांनी ‘तू छुपी है कहां’ या गाण्यात आशाताईंच्या नेहमीच्या स्केलपेक्षा वरच्या स्वरात गायला सांगितलं, तर खय्याम यांनी ‘इन आंखों की मस्ती के’ अशा ‘उमराव जान’ चित्रपटातील गाण्यांसाठी खालच्या स्वरात गाण्याचं आव्हान दिलं. दोन्ही आव्हानं आशाताईंनी लीलया पेलली.

सचिन देव बर्मन यांनी आशा भोसले यांच्या आवाजातील वैविध्याचा उत्तमरीत्या वापर केला आणि ‘रेशमी उजाला है’पासून ‘काली घटा छाए मोरा जिया तरसाये’, ‘देखने में भोला है’ अशी गाणी दिली. राहुल देव बर्मन यांनी आशा भोसले यांच्या आवाजातील लवचीकतेचा आणि नावीन्यपूर्ण प्रयोग शिकण्याच्या वृत्तीचा उत्तम वापर करून प्रत्येक ओळीला स्केल बदलणारं ‘दैय्या दैय्या मैं कहां फंसी’ गाणं तयार केलं. ‘घर जायेगी तर जायेगी’ (‘खुशबू’ १९७५) या गाण्यात लग्नाची आतुरतेनं वाट बघणाऱ्या नायिकेच्या मनातली चलबिचल व्यक्त करण्यासाठी प्रत्येक शब्दात स्वरांचे चढउतार असलेलं गाणं तयार केलं. ते ऐकतानाच दमछाक होते, त्यामुळे अशी गाणी लाइव्ह सादर केली जात नाहीत. यानंतर बप्पी लाहिरीपासून ए. आर. रेहमान यांनी संगीतामध्ये विविध प्रयोग करताना आशाजींच्या आवाजात यापूर्वीच्या संगीतकारांनी पडताळून



आशाताई आणि राहुल देव : एकमेकांना समृद्ध करणारी जोडी



वाढदिवस साजरा करताना आशा, राहुल आणि गुलजार :
ऐन उमेदीतलं छायाचित्र

# १. घर जायेगी तर जायेगी

घर जायेगी तर जायेगी डोलियाँ चढ़ जायेगी
घर जायेगी तर जायेगी हो डोलियाँ चढ़ जायेगी
मेहंदी लगायेगी रे काजल सजायेगी रे
दुल्हनिया मर जायेगी

धीरे धीरे लेके चलना आँगन से निकलना
कोई देखे ना दुल्हन को गली में
अँखियां झुकाए हुए घूँघटा गिराए हुए
मुखडा छुपाए हुए चली मैं
जायेगी घर जायेगी तर जायेगी

मेहंदी मेहंदी खेली थी मैं तेरी ही सहेली थी मैं
तू ने जब कुसुम को चुना था
तू ने मेरा नाम कभी आँखों से बुलाया नहीं
मैंने जाने कैसे सुना था
जायेगी घर जायेगी..

घर जायेगी तर जायेगी हो डोलियाँ चढ़ जायेगी
मेहंदी लगायेगी रे काजल सजायेगी रे
दुल्हनिया मर जायेगी

---

चित्रपट - खुशबू (१९७५)
गीतकार - गुलजार
संगीतकार - राहुल देव बर्मन

---

शरदचंद्र चट्टोपाध्याय यांच्या ‘पंडितमशाय’ या बंगाली कादंबरीवर आधारित बंगाली चित्रपट १९५१ साली नरेश मित्र यांनी तयार केला होता. याच बंगाली कादंबरीवर आधारित पटकथा ‘खुशबू’ या चित्रपटासाठी गुलजार, डी. एन. मुखर्जी आणि भूषण बनमाली यांनी लिहिली, संवादलेखन आणि दिग्दर्शन गुलजार यांनी केलं. जितेंद्रनं काही हटके चित्रपट करण्याचा विचार करून आपल्या भावांना निर्माते बनवलं आणि ‘परिचय’, ‘खुशबू’ अशा चित्रपटांची निर्मिती केली. लहानपणी ठरलेल्या विवाहाची आस धरून राहिलेल्या कुसुमचा विवाह अजूनही डॉक्टर वृंदावनबरोबर झालेला नाही. स्पष्टपणे न बोलता काही गोष्टी गृहीत धरल्यामुळे गैरसमज दोन्ही बाजूंनी वाढत राहतात. वारंवार पुढे ढकलल्या जाणाऱ्या विवाहामुळे कुसुम निराश झालेली आहे. एकदा डॉक्टर वृंदावन आणि कुसुम यांची भेट होते, त्यामध्ये गैरसमज दूर होतात आणि ठरलेलं लग्न साकार होण्याच्या तिच्या आशा पुन्हा पल्लवित होतात.

राहुल देव बर्मन यांनी गाणं संगीतबद्ध करताना नायिकेच्या भावविश्वाचा विचार करून ती किती रोमांचित झाली आहे, हे संगीतामधून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. गाण्यात कॉंगोच्या बीटवर पंडित शिवकुमार शर्मा यांचं संतूर कधी तालावर तर कधी ‘ऑफ बीट’ वाजतं, कारण कुसुमला काय करू आणि काय नको, असं झालं आहे. तिचं स्वप्न पूर्ण होणार आहे, त्यामुळे ती उल्हसित झाली आहे. त्याच वेळी तिच्या मनात एक अनामिक धाकधूक आहे. त्यामुळे ‘धीरे धीरे लेके चलना आँगन से निकलना’ अंतरा गाताना त्यामध्ये चढ-उतार दाखवण्याची कल्पकता संगीतकार राहुल देव बर्मन यांनी दाखवली आणि आशा भोसले यांनी त्या गायनाला योग्य न्याय दिला. घराच्या अंगणातून निघताना कोणी आजूबाजूला नाही, याची खात्री करून घुंघटा तोंडावर ओढून मी चेहरा झाकून निघाले आहे. याचा अर्थ लक्षात घेऊन या ओळीमध्ये चढ-उतार नाहीत, हे विशेष. गाण्यातले पॉज गाण्याची खुमारी वाढवतात. दुसऱ्या कडव्यापूर्वी कुसुमला भूतकाळ आठवतो, त्यामुळे व्हायोलिन आणि बासरीचे आर्त स्वर ऐकू येतात. फ्लॅशबॅक संपताच पंडित शिवकुमार शर्मा यांनी संतूरवर वाजवलेला तुकडा दोन वेगळ्या लयींमध्ये आहे. एकूणच हे गाणं बदलत्या भावभावनांचा खेळ असल्यामुळे आशाच्या गायनामध्ये आणि संतूरवादनामध्ये लयकारीचा आनंद घेता येतो.

गुलजार यांचीच पटकथा आणि दिग्दर्शन असल्यामुळे प्रसंगाला अनुरूप गीत गुलजार यांनी लिहिलं आहे, त्यामुळे दुसऱ्या कडव्यामध्ये ‘तू ने जब कुसुम को चुना था’ अशी ओळ आहे. हे वाक्य ती जणू स्वत:शीच बोलत असल्यामुळे दिग्दर्शक गुलजार यांनी इथे आरशाचा योग्य वापर

आहे आणि आशा म्हणजे अमृत आणि मद्य यांचं कॉकटेल आहे!

लता आणि आशा यांची युगूल गीतं संख्येनं कमी आहेत. ‘हमरे गांव कोई आएगा’ (‘प्रोफेसर’), ‘कर गया मुझ पे जादू’ (‘बसंत बहार’ - शंकर-जयकिशन), ‘मेरे मेहेबूब में क्या नहीं’ (‘मेरे मेहेबूब’ - नौशाद), ‘मैं चली मैं चली देखो प्यार की गली’ (‘पडोसन’ - राहुल देव बर्मन), ‘मन क्यूं बहका’ (‘उत्सव’ - लक्ष्मीकांत-प्यारेलाल), ‘जब जब तुम्हें भुलाया’ (‘जहां आरा’), ‘प्यार ज़िंदगी है’ (‘मुकद्दर का सिकंदर’ - कल्याणजी-आनंदजी) या गाण्यांत नायिकेसाठी लताचा आणि नायिकेच्या मैत्रिणीसाठी/सहनायिकेसाठी/क्लब डान्सरसाठी आशाचा आवाज वापरण्यात आला. ‘लवंगी मिरची मैं कोल्हापूर की’ (‘अशांती’) या गाण्यात राहुल देव बर्मन यांनी हिंदीमधल्या लावणीकरिता दोन नायिकांसाठी लता आणि आशाचा आवाज वापरला आहे. परंतु लावणी हा आशाचा प्रांत आहे, हे गाणं ऐकताना जाणवतं.

या सर्व बाबींचा विचार करता सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केलेलं हे गाणं उजवं ठरतं, कारण या गाण्यात दोन्ही गायिकांना समान संधी आहे आणि दोन्ही गायिकांनी त्या संधीचं सोनं केलं आहे.

♫



*ऐन तारुण्यातल्या आशाचं सस्मित दर्शन मोहकच होतं...*

चित्रपट - फिर वही दिल लाया हूं (१९६३)
गीतकार - मजरूह सुलतानपुरी
संगीतकार - ओ. पी. नय्यर

एका गाण्यात एक से बढकर एक अशा चार चाली लावणं किती कठीण काम असेल? ओंकार प्रसाद नय्यर यांनी ही किमया केली आहे. गाणं आपल्या ओळखीचं आहे, तरीही सहजपणे आपल्या लक्षात येत नाही, त्यात काय आणि किती विविधता आहे – वेगवेगळ्या चाली, गाण्यात त्याचे वेगवेगळे ठेके, वेगवेगळी वाद्यं, त्यांचा चपखल वापर. सोने पे सुहागा म्हणजे मोहम्मद रफी-आशा भोसले यांचा स्वरसाज.

'फिर वही दिल लाया हूं' चित्रपटातील मजरूह सुलतानपुरी लिखित गाणं 'दूर बहुत मत जाइये, ले के करार हमारा' या ओळीनं सुरू होतं. त्याला जवाब मजरूह यांनी लिहिला आहे, 'पास रहो या दूर तुम, तुम हो साथ हमारे'. त्यानंतर गाण्याची धून बदलते आणि 'नाज़नीन बडा रंगीन है वादा तेरा' हा मुखडा रफीच्या आवाजात आपण पंडित शिवकुमार शर्मा यांच्या संतूरच्या साथीनं ऐकतो. साथीला पंजाबी ढोलक वाजतो. इथे संतूर हे फक्त साथीचं वाद्य न वापरता, त्याचा एक रिदम तयार होतो. त्यानंतर आशा भोसले साथीनं म्हणतात, 'होऽऽऽऽ हमदम मेरे, खेल न जानो चाहत के इक़रार को, जान-ए-जहाँ, याद करोगे, इक दिन मेरे प्यार को'. ही तिसरी धून वेगळीच आहे. आशाताई गातात त्या वेळी ढोलक थांबला आहे, ड्रम सुरू होतो आणि ड्रमचा आवाज थांबून केस्टनेट हे एकमेव तालवाद्य वाजतं.

दुसऱ्या कडव्यापूर्वीचं संगीत वेगळंच आहे, ज्यामध्ये व्हायोलिननंतर मेंडोलिन आणि गिटारवर रिदम वाजतो. अशा प्रकारे चार वेगवेगळ्या धून असलेलं हे गाणं जितकं ओ. पी. नय्यर यांचं आहे, तितकंच रफी-आशाचं आहे. या गाण्याच्या संगीत-संयोजनामध्ये अनेक वाद्यांचा सुरेल संगम झाला आहे.

'छाये हो, मेरे दिल पे, नज़र पे तुम्हीं' असं आशाताई गायला सुरुवात करतात, त्याच वेळी ढोलक सुरू होतो. पंडित शिवकुमार शर्मा यांनी उपलब्ध वेळेमध्ये आपला हुनर संतूरवर लयकारी करून दाखवला आहे. नायिका म्हणते, 'ए जी हम से तुम्हें एक लगावट तो है, तुम्हें हम से मुहोब्बत नहीं'. यावर रफी पुन्हा मुखड्याकडे वळतात, तेव्हा ड्रमवादनानं ठेका बदलतो. ड्रमचा वापर मोजकाच केला आहे. दुसऱ्या कडव्यापूर्वी दक्षिणा मोहन टागोर तार शहनाईवर वेगळीच धून वाजवतात. त्याला टाळ्यांचा ठेका अर्ध्यावर आलेल्या लयीमध्ये दिला आहे. इथे चाल बदलली आहे, ठेकासुद्धा



*आशाताई गाताना स्वत: आनंद घेतात आणि श्रोत्यांनाही भरभरून देतात.*

बदलला आहे आणि द्रुत लयीमध्ये टाळ्या वाजत असताना एकदम मूळ गाण्याची लय सुरू होते. पण श्रोत्याला कुठेही जर्क बसत नाही, आपण गाण्याबरोबर वेगवेगळ्या लयींत ठेका धरतो. एका चालीवरून दुसऱ्या चालीवर येणं आणि श्रोत्यांना त्यामध्ये सहभागी करून घेणं कॉम्पोझिशनच्या दृष्टिकोनातून अवघड काम आहे. ओ. पी. नय्यर यांनी धाडसानं असे अनेक प्रयोग केले.

नासिर हुसेन गाण्यांचं चित्रीकरण करण्यात वाकबगार होते. रफीच्या आवाजाला न्याय देण्यात सिनेमाचा नायक – जॉय मुखर्जी कमी पडतो. शम्मी कपूरची नक्कल करण्याचा प्रयत्न केला, तरी त्याला रिदम सेन्स नाही आणि अभिनयाचा त्याच्याशी दूरदूरचा संबंध नाही. त्यामुळे गाण्याचा खरा लुत्फ घेण्यासाठी गाणं पाहण्यापेक्षा ऐकावं. 'देखो बिजली डोले बिन बादल की', 'आंखों से जो उतरी है दिल में' अशी गाणी आवर्जून ऐकत राहावी अशी आहेत.

'प्राण जाये पर वचन न जाये' या चित्रपटातील 'एक तू है पिया जिस पे दिल आ गया' या गाण्यातही तीन वेगवेगळ्या चाली आहेत. तो चित्रपटही तितका चालला नाही, पण ओ. पी. नय्यर यांची गाणी बहारदार होती. 'चैन से हम को कभी, आप ने जीने ना दिया, ज़हर भी चाहा अगर, पीना तो पीने ना दिया' या गाण्यानं ओ. पी. नय्यर आणि आशा भोसले यांचं कलेच्या प्रांगणातलं साहचर्य थांबलं.

♫

रंग-ए-महफिल है रातभर के लिये
सोचना क्या अभी सहर के लिये
साक़िया, आज मुझे नींद नहीं आयेगी
सुना है तेरी महफ़िल में रत जगा है

त्यांची गाणीच इतकी आहेत, की एक महिनाभर एका संगीतकाराची गाणी ऐकावीत, एक महिना एका गीतकाराची गाणी ऐकावीत, किशोर - रफी - मुकेश - लता अशा एकसे बढकर एक गायक/गायिकांबरोबर पेश केलेली युगूल गीतं ऐकावीत. वेगवेगळ्या मूडची, वेगवेगळ्या प्रसंगांतील, रागसंगीताची, विविध नृत्यप्रकारांची गाणी ऐकावीत. प्रख्यात कवी - शायर सुरेश भट यांच्याच शब्दात सांगायचं झालं तर,

हा कंठ तुझा अलबेला! हा रंग तुझा मतवाला
तलवार तुझ्या गाण्याची बिजलीसम तळपत राहो!

♫



*गाण्यावर गंभीर चर्चा : किशोर कुमार, आशा भोसले आणि राहुल देव बर्मन*